| | |
|---|---|
| **MHTH270066552023** | दाखल तारीख : १३.०३.२०१६ |
| | नोंदणी तारीख : १३.०३.२०१६ |
| | निकाल तारीख : ०३.०५.२०२५ |
| | कालावधी: ०९वर्षे ०१महिना २०दिवस |

**अतिरिक्त सत्र न्यायाधीश, बेलापूर, जिल्हा ठाणे यांच्या न्यायालयात**
**(पिठासीन आधिकारी : पी. अे. साने)**

| | | |
|---|---|---|
| | | **स्पेशल केस नं. ९०२/ २०२३**<br>जुना ठाणे सत्र खटला क्र. ५२७/२०१९<br>**निशाणी क्र.५६** |
| | | गुन्हा रजि. क्र. I ३९९/२०१५<br>पोलीस स्टेशन रबाळे, नवी मुंबई |
| | | |
| फिर्यादी | : | **महाराष्ट्र शासन** |
| | | फिर्यादीकरिता श्री. योगेंद्र पाटील,<br>अतिरिक्त सरकारी वकील |
| | | |
| आरोपी | : | **१. सुरज सुभाष चौधरी,**<br>वय:२४ वर्षे, व्यवसाय: नोकरीण<br>**२. सुभाष कृष्णा चौधरी,**<br>वय:४८ वर्षे, व्यवसाय: नोकरी.<br>**३. छाया सुभाष चौधरी,**<br>वय:४५ वर्षे, व्यसाय: गृहिणी,<br>सर्व रा. शिवाजी तलावाजवळ, मधुकर म्हात्रे यांची खोली, घणसोली गाव, नवी मुंबई. |
| | | आरोपीतर्फे वकील श्री. अनिल मिश्रा. |

| | | |
|---|---|---|
| गुन्हाची तारीख | : | दि.१९.०८.२०१५ ते दि. |

| | | |
|---|---|---|
| | | २३.११.२०१५ |
| प्रथम खबरीची तारीख | : | २७.११.२०१५ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याची तारीख | : | १३.०३.२०१६ |
| दोषारोप निश्चितीची तारीख | : | ११.०५.२०१६ |
| पुरावा नोंदवायला सुरुवात झाल्याची तारीख | : | ०७.०२.२०२३ |
| निकालपत्र राखून ठेवल्याची तारीख | : | .. |
| निकालपत्राची तारीख | : | ०३.०५.२०२५ |
| शिक्षा सुनावली असल्यास त्याची तारीख | : | नाही. |

## आरोपींचा तपशील

| अनुक्रमांक | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामिनावर सुटका झाल्याची तारीख | दोषारोप निश्चितीचे कलमे | निर्दोषमुक्ती की शिक्षा फर्मावली | फर्मावलेली शिक्षा | फौ. प्र. संहिता कलम ४२८ अन्वये शिक्षेतून मिळालेल्या सूट चा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| १ | सुरज सुभाष चौधरी | २९.११.१५ | | भा.द.वि. कलम ३७६, ३८४, ४१७, ३४१, ३९२, ३२३, ५०६,३४ | निर्दोषमुक्ती | निरंक | ... |
| २ | सुभाष कृष्णा चौधरी | २४.०२.१६ | | ‘‘..’’ | ‘‘..’’ | ‘‘..’’ | ... |
| ३ | छाया सुभाष चौधरी | ‘‘..’’ | | ‘‘..’’ | ‘‘..’’ | ‘‘..’’ | ... |

**अ. अभियोगपक्ष / बचावपक्ष / न्यायालयाने स्वतःहून तपासलेल्या साक्षीदारांची यादी**

| | | |
|---|---|---|
| | **अभियोगपक्ष** | |
| **अनुक्र.** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
| सा.क्र.१ | पीडीत, नि. क्र.१४ | फिर्यादी |
| सा.क्र.२ | सिमा सुरेश मुंढे, नि. २३ | तपासी अंमलदार |
| | | |
| | **बचावपक्ष** | |
| | निरंक | |
| | | |
| | **न्यायालयाचा साक्षीदार** | |
| | निरंक | |

**ब.**

| | **अभियोगपक्षाच्या निशाण्या** | **स्वरुप** |
|---|---|---|
| १ | नि.२५ | रिपोर्ट |
| २. | नि.२६ | पुरवणी जबाब |
| ३. | नि.२७ ते ३१ | अधोरेखीत भाग अ ते इ. |
| ४. | नि.३२ | दि.२७.११.२०१५ रोजीचे पत्र |
| ५. | नि.३३ | वैदयकीय प्रमाणपत्र |
| ६. | नि.३४ | अटक पंचनामा |
| ७. | नि.३६ | पत्र. |
| ८. | नि.३७ | आरोपीचे वैदयकीय प्रमाणपत्र |
| ९ | नि.३८, ४० | जप्ती पंचनामा |

| | | |
|---|---|---|
| १० | नि.४१ | निवेदन |
| | नि.४२ | पंचनामा |
| | नि.४३ | मुद्देमाल पावती |
| | नि.४४ | सोनाराने दिलेली पावती |
| | नि.४५ | घटनास्थळ पंचनामा |
| | नि.४७ | प्रयोग शाळा कलीना यांना दिलेला अर्ज व पत्र |
| | नि.४८ | वैदयकीय अधिकारी यांना दिलेले पत्र |
| | नि.४९, ५० | सी. ए. रिपोर्ट |
| | | |
| | **बचावपक्षाच्या निशाण्या** | |
| | | |
| | निरंक | |
| | | |
| | **न्यायालयाच्या निशाण्या** | |
| | निरंक | |

## क. मुद्देमाल वस्तू :

| | | |
|---|---|---|
| | **अभियोगपक्ष** | |
| | निरंक | |
| | | |
| | **बचावपक्ष** | |
| | निरंक | |

## न्यायनिर्णय

(दिनांक ०३ मे २०२५ रोजी जाहीर )

१. आरोपी याचेवर भारतीय दंड विधान कलम ३७६, ३८४, ४१७, ३४१, ३९२, ३२३, ५०६ सह ३४ प्रमाणे दोषारोपपत्र दाखल केले आहे.

२. फिर्यादी पक्षाची केस थोडक्यात अशी की, फिर्यादी अ, वय २० वर्षे हिने दि.१७.११.२०१५ रोजी पोलिसांना रिपोर्ट दिला की, तिचे दि.३०.०४. २०१५ रोजी सुजित यांच्याशी विवाह झाला. लग्नाच्या आधी तिचे दोन वर्षापुर्वी पासून सुरज याचेशी प्रेम संबंध होते. सुरज याचे आईवडिलांनी लग्नास विरोध केल्याने तिचे आईवडिलांनी सुजित याचेशी तिचा विवाह करून दिला. नंतर ती तिचे सासरी नांदू लागली.

मे २०१५ मध्ये सुरज याने अचानक तिला फोन केला व ''तु माझेशी लग्न कर अथवा माझेकडे तुझे फोटो आहेत ते मी तुझे पतीला दाखविन'' असे तो बोलला. सुरूवातीला तिने त्याचेकडे लक्ष दिले नाही. त्यानंतर दि.१९.०८. २०१५ रोजी सुरज याने तिला फोन करून तो तिचे सासरी येत असल्याचे सांगितले व तिचे घरच्यांना फोटो दाखवितो असे तो बोलला. त्यामुळे ती, तिची सासु व नणंद हे सुरज यास भेटले. त्यावेळेला त्याने त्यांचे जुने फोटो दाखविले. सबब तिला भिती वाटली. त्याने तिला त्याचे सोबत चालावयास सांगितले अथवा तिचे नव—याला सांगेन असे देखील तो बोलला. त्यानंतर ती त्याचे बरोबर निघून त्याचा मित्र जो पवई येथे राहत होता तेथे दोघे राहिले व मित्राच्या घरी आपण वाराणसीला चाललो आहे असे सांगितले. दि.२२.०८.२०१५ ला ते वाराणसीला गेले व तेथे चार दिवस एकत्र राहिले. त्यावेळेला सुरज याने त्या दोघांचाही मोबाईल बंद केला. दि.२५.०८.२०१५ ला सुरज याने त्याच्या वडिलांना फोन केला त्यावेळेला त्याला समजले की तो बेपत्ता असल्याचा रिपोर्ट त्याचे वडिलांनी दिला. त्यामुळे ते परत वाराणसीवरून आले व घणसोली येथे सुरज जेथे राहत होते तेथे रहावयास आले. तेथे सुरजचे आईवडिल, भाउ—बहिण राहत होते. सुरजने तिचे सीमकार्ड तोडून टाकले. सुरजने तेथे तिची इच्छा नसतांना तिच्याशी शारीरिक सबंध केले व लग्न करण्याचे आमिष दाखवून जबरी संभोग केला. त्यानंतर १५ दिवसांनी सुरजचे आईवडिल बोलले की तिने तिच्या

आईवडिलांकडून पैसे आणावे नाहीतर आम्ही सुरजचे दुसरे लग्न लावून देवू असे बोलून तिला मारहाण केली व तिला घरामधून बाहेर दिले जावू देत नव्हते. माहे सप्टेंबर २०१५ मध्ये सुरज चौधरी, त्याचे आईवडिल, मित्र असे भेटले. फिर्यादीने तिच्या मित्राला तिला घरात डांबून ठेवले जाते असे सांगितले. दि.१६.११.२०१५ रोजी सुरज व त्याच्या आईवडिलांनी तिला कॅन्सर झाला असे सांगितले त्यामुळे त्यांनी तिच्या डोक्यावरील केस काढले, परंतु तिचे डोक्यावरील पुरळ बरे झाले नाही. सुरज व त्याचे घरचे तिला मारहाण करत असे. त्यांनी तिचे दागिणे काढून घेतले. दि.२४.११.२०१५ रोजी तिने सुरजला लग्न कधी करणार असे विचारले असता त्याने नकार दिला, मारहाण केली व ठाणे रेल्वे स्टेशनला सोडले. अशा स्वरूपाची फिर्याद पीडीताने दिली. त्याप्रमाणे गुन्हा क्र. ३९९/२०१५ भादवि कलम ३७६, ३८४, ४१७, ३४१, ३९२, ३२३, ५०६ सह ३४ प्रमाणे दाखल झाला.

**३.** तपासी अंमलदार यांनी तपासादरम्यान घटनास्थळाचा पंचनामा नोंदविला, साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले, पीडीताचे वैदयकीय प्रमाणपत्र उपलब्ध करून घेतले. सीडीआर व एसडीआर उपलब्ध करून घेतले. आरोपीतास अटक केली. आरोपीची वैदयकीय तपासणी करून घेतली व त्यांचे तपासादरम्यान यातील आरोपीतांनी गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांनी आरोपींविरुध्द जेएमएफसी कोर्टामध्ये दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** सदरची केस ही सेशन्स कोर्टात केवळ चालविण्यास पात्र असल्याने सदर केस फौ.प्र.सं.कलम २०९ प्रमाणे वर्ग केली.

**५.** माझे पूर्वअधिकारी यांनी उभयपक्षांचा युक्तिवाद विचारात घेवुन आरोपी याचे वर नि. क्र.७ येथे दोषारोप ठेवले. सदरचे दोषारोप आरोपीला त्याचे बोली भाषेतुन वाचुन दाखविले असता, त्याने ते अमान्य केले.

**६.** फिर्यादीपक्षाने आरोपींवरील दोषारोप सिध्द करण्याचेकामी साक्षीदार

तपासले. आरोपींचे फौजदारी प्रक्रीया संहीता कलम ३१३ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले. आरोपीतांचा बचाव असा की, त्यांनी काहीएक गुन्हा केलेला नाही.

७. आरोपी पक्षाने बचावाच्या कामी काहीएक साक्षीपुरावा सादर केलेला नाही. अभियोग पक्षाचा युक्तिवाद ऐकला.

८. अभियोग पक्षाची केस, त्यांनी सादर केलेला पुरावा, उलटतपास, आरोपीने फौ.प्र.सं. कलम ३१३ मध्ये दिलेल्या प्रश्नांची उत्तरे व उभय बाजुंचा युक्तीवाद विचारात घेतल्यानंतर, खालील मुददे माझे विचारांती उपस्थित झाले असुन, मी त्याचे निष्कर्ष त्याचेसमोर खालील दिलेल्या कारणमिमांसेवरुन नोंदविलेले आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, दि.१९.०८.२०१५ ते दि.२३.११.२०१५ या कालवधीत आरोपी क्र.१ याने त्याचे घरी पीडीतेवर तिचे इच्छेशिवाय लग्नाचे खोटे आश्वासन देवून जबरदस्तीने शारीरीक संबंध ठेवले आणि त्याद्वारे भा.दं.वि. कलम ३७६ अन्वये गुन्हा केला काय? | नाही. |
| २) | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, वरील कालावधीत, वेळ व ठिकाणी आरोपीतांनी आपसात संगनमत करून पीडीताला तिचे आईवडिलांकडून पैसे आणण्यासाठी धमकावले आणि त्याद्वारे त्याद्वारे भा.दं.वि. कलम ३८४ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | नाही. |
| ३) | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, वरील कालावधीत, वेळ व ठिकाणी आरोपी क्र. १ याने पीडीत व त्याचे स्वत:बरोबरचे प्रेमसंबंधाचे फोटो पीडीताचे पतीस दाखवीन अशी धमकी दिली तसेच इतर आरोपीतांनी फिर्यादीचे सोन्याचे दागिणे | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | काढून तिची फसवणुक केली आणि त्याद्वारे भा.दं. वि. कलम ४१७ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | |
| ४) | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, वरील कालावधीत, वेळ व ठिकाणी आरोपीतांनी आपआपसांत संगनमत करुन फिर्यादी यांना मारहाण करून त्यांचे घरी डांबून ठेवले आणि त्याद्वारे भा.दं.वि. कलम ३४१ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | नाही. |
| ५) | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, वरील कालावधीत, वेळ व ठिकाणी आरोपीतांनी आपआपसांत संगनमत करुन फिर्यादीचे अंगावर असलेले सोन्याचे दागिने बळजबरीने काढून घेतले. आणि त्याद्वारे भा.दं.वि. कलम ३९२ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | नाही. |
| ६) | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, वरील कालावधीत, वेळ व ठिकाणी आरोपीतांनी आपआपसांत संगनमत करुन फिर्यादीस मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत पोहचवली आणि त्याद्वारे भा.दं.वि. कलम ३२३ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | नाही. |
| ७) | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, वरील कालावधीत, वेळ व ठिकाणी आरोपीतांनी आपआपसांत संगनमत करुन फिर्यादी यांना दमदाटी करून फौजदारीपात्र धाकदपटशा केला आणि त्याद्वारे भा.दं.वि. कलम ५०६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | नाही. |
| ८) | काय आदेश ? | आरोपीतास दोषमुक्त करण्यात येत आहे. |

## **कारणमिमांसा**

**मुददा क्र. १ ते ७ अन्वये —**

(वरील सर्व मुददयांच्या संदर्भात फिर्यादी पक्षाचा पुरावा हा एकच असल्याने व

चर्चेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता वरील सर्व मुददयांची चर्चा एकत्रित केली आहे).

**९.** फिर्यादी पक्षाच्या केस प्रमाणे यातील आरोपी क्र.१ सुरज चौधरी याने यातील फिर्यादी पीडीत हिचेशी लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध केले व संभोग केला अशी फिर्यादी पक्षाची केस आहे. तर इतर आरोपीतांनी पीडीताला तेथे डांबून ठेवले, मारहाण केली, शिवीगाळ करून दमदाटी केली, तिच्याकडून जबरदस्तीने दागिने काढून घेतले अशी फिर्यादी पक्षाची केस आहे.

**१०.** अभियोग पक्षाने तिला नि.१४ येथे सा.क्र.१ म्हणून तपासलेले असून तिने आपले पुराव्यामध्ये सांगितलेले आहे की तिचे सुजित याचेशी दि.३०.०४. २०१५ रोजी लग्न झाले. लग्नापुर्वी तिचे आरोपी बरोबर प्रेम संबंध होते. लग्नानंतर ती नांदावयास गेली. ती आरोपी क्र.१ बरोबर पळून गेली व ते वाराणसीला पळून गेले. आरोपीने तिला कधीही धमकावले नाही. ती आरोपी बारोबर चार पाच दिवस वाराणसी येथे राहिली. आरोपीने तिच्याबरोबर कधीही जबरदस्तीने शारीरीक संबंध केलेले नाही किंवा धमकावले नाही असे सांगितलेले आहे. आरोपीतांनी तिचेकडून जबरदस्तीने अंगावरील दागिने काढून घेतले असल्याचे तिने नाकारलेले आहे. तिने केवळ फिर्यादीवरील आपली स्वाक्षरी मान्य केली आहे. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. सबब, सदर साक्षीदाराचा उलटतपास अभियोग पक्षाने घेतला त्यामध्ये तिने मान्य केले की ती व अरोपी क्र.१ हे दोघे स्वेच्छेने एकत्र राहत आहेत, ते नवरा बायको आहेत, ती आरोपी पासून गरोदर आहे. तिची आरोपीचे विरूध्द साक्ष देण्याची इच्छा नाही. सदर साक्षीदाराने आपले फिर्यादीतील मजकूर अमान्य केला.

**११.** वरील साक्षीदाराचा पुराव्याचा विचार करता सदरील पीडीत हिचा साक्षीपुरावा हा तिने दिलेल्या फिर्यादीशी विसंगत आहे. सदरची बाब ही अभियोग

पक्षास हानीकारक आहे.

**१२.** अभियोग पक्षाने सा.क्र.२ तपासी अंमलदार सीमा मुंढे यांना नि.२३ वर तपासलेले आहे. सदरच्या साक्षीदाराने त्यांनी यातील पीडीत हिची फिर्याद घेतली होती व त्यातील मजकूर पीडीताने सांगितला होता असे सांगितले आहे. सदरची एफआयआर नि.२५ वरती आहे. सदर साक्षीदाराने पुढे सांगितले आहे की त्यांनी पीडीताला वैदयकीय तपासणीला पाठविले व तो रिपोर्ट याकामी दाखल आहे, तो नि.३३ वरती आहे. तिने आरोपीतांना अटक केली. आरोपीतांची वैदयकीय तपासणी करून घेतली ते प्रमाणपत्र नि.३७ वर आहे. आरोपीतांकडून काही कपडे जप्त केले. घटनास्थळाचा पंचनामा केला असे तिने सांगितले आहे. सदर साक्षीदाराने आपले पुराव्यामध्ये पुढे असे सांगितले आहे की सदर गुन्हयाच्या कामी तिने दागिने देखील जप्त केले. घटनास्थळाचा पंचनामा केला तो नि.४५ वरती आहे. फिर्यादीचे आणि आरोपीचे सॅम्पल तपासणीकरता सीए ला पाठविण्यात आले. सीए रिपोर्ट नि.४९ आणि ५० याठिकाणी आहे. याठिकाणी असे नमूद करावेसे वाटते की सदर साक्षीदाराचे म्हणण्याप्रमाणे यातील आरोपीतांनी गुन्हा केला आहे असे त्यांचे तपासामध्ये नमूद करण्यात आले परंतु अशा स्वरूपाच्या केसेसमध्ये यातील फिर्यादी जी पीडीत महिला आहे तिचा तोंडी पुरावा महत्वाचा आहे. यातील पीडीताने आरोपीने तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध केले, तिला दुखावले, मारहाण केली इ. बाबी नाकारलेली आहे. तिच्या उलटतपासामधून अभियोग पक्षाच्या केसला पुष्टी देणा—या काहीएक बाबी आलेल्या नाही. नि.४९ आणि ५० वर सीए रिपोर्ट असून तो देखील अभियोग पक्षास सहाययभूत नाही. अभियोग पक्षाने सादर केलेल्या पुराव्यावरून यातील आरोपी क्र.१ याने यातील फिर्यादी हिच्याशी लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी शारीरिक संबंध करून तिचेवरती बलात्कार केला ही बाब शाबित करण्यास असमर्थ ठरले आहे. तसेच सर्व आरोपीतांनी मिळून फिर्यादी पीडीत हिला जबरदस्तीने डांबून ठेवणे, तिला मारहाण करणे, शिविगाळ करणे या बाबी देखील अभियोग पक्ष सबळ पुराव्याद्वारे शाबित करण्यास असमर्थ ठरले आहे. अशा

स्थितीमध्ये आरोपीतांवरील ठेवण्यात आलेल्या दोषारोपांचा विचार करता सदरचे दोषारोप हे सबळ पुराव्याद्वारे शाबित होवू शकलेले नाही. सबब मी मुद्दा क्र. १ ते ७ यास नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.८ अन्वये –**

१३. वरील मुद्दा क्र.१ ते ७ यांचे चर्चेवरून आरोपीवरील दोषारोप हे सबळ पुराव्याद्वारे सिध्द न झाल्याने आरोपीतांना त्यांच्यावर ठेवण्यात आलेल्या दोषारोपातून मुक्त करणे गरजेचे आहे. सबब मी मुद्दा क्र.८ यास अंतीम आदेशाप्रामणे निष्कर्ष नोंदवित आहे.

**: आदेश :**

(१) **आरोपी क्र.१ सुरज सुभाष चौधरी, क्र.२ सुभाष कृष्णा चौधरी आणि क्र.३ छाया सुभाष चौधरी** यांची फौ.प्र.सं. कलम २३५(१) अन्वये भारतीय दंड विधान कलम ३७६, ३८४, ४१७, ३४१, ३९२, ३२३, ५०६ सह ३४ चे दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

(२) यातील आरोपीतांनी फौ.प्र.सं.कलम ४३७–अ अन्वये प्रत्येकी रू. ५,०००/– चा वैयक्तीक जात मुचलका आणि तीतक्याच रक्कमेचा जामीन देणेचा आहे.

(३) जप्त मुद्देमाल कपडे हे अपिलाचा कालावधी संपल्यानंतर नाश करण्यात यावा.

(४) खुले न्यायालयात घोषीत.

दिनांक – ०३/०५/२०२५
बेलापुर

( पी.अे. साने. )
अती. सत्र न्यायाधीश,
बेलापुर, नवी मुंबई